N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** सोलापुर ग्रामीण **P.S.(ठाणे):** मोहोळ

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0043 **Year (वर्ष):** 2024

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**22/01/2024 22:16

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |
| 3 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** सोमवार **Date From (दिनांक पासून):** 22/01/2024
   **Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 22/01/2024
   **Time From (वेळेपासून):** 12:12 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 13:05 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 22/01/2024 **Time (वेळ):** 21:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 037

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 22/01/2024 22:07 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पूर्व, 03 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** पुणे-सोलापूर रोडवर असलेल्या सं

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** संदेश मच्छिंद्र सुरवसे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1994

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | चिंचोलीकाटी, ता मोहोळ, जि स,मोहोळ ,सोलापुर ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | चिंचोलीकाटी, ता मोहोळ, जि स,मोहोळ ,सोलापुर ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | संतोषकुमार नागनाथ वाघ | | | 1. गवत्या मारुती चौक, मोहोळ, ता,मोहोळ ,सोलापुर ग्रामीण, महाराष्ट्र,भारत |
| 2 | परशुराम रविंद्र पाटोळे | | | 1. चिंचोलीकाटी, ता मोहोळ , मोहोळ ,सोलापुर ग्रामीण, महाराष्ट्र,भारत |
| 3 | सुधीर लांडगे | | | 1. सावळेश्वर, मोहोळ ,मोहोळ , सोलापुर ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

मी संदेश ऊर्फ बबरुवान ऊर्फ बबलू मच्छिंद्र सुरवसे, वय 30 वर्षे, व्यवसाय - माथाडी कामगार, रा. मु.पो. चिंचोलीकाटी, ता. मोहोळ, जि. सोलापूर मो. क्र. 9960007819, 9637007813 समक्ष हजर राहून फिर्याद देतो की,

मी दि. 20/01/2024 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो, सोलापूर येथील पो.उप अधि. श्री. गणेश कुंभार यांचे समक्ष उपस्थित राहून माझ्याकडे होत असलेल्या लाच मागणीबाबत थोडक्यात तक्रार सांगीतली. माझ्या तक्रारीवर पुढील कार्यवाही करण्याकरीता पो.उप अधि. श्री. कुंभार यांनी सोलापूर महानगरपलिका, सोलापूर येथील दोन शासकीय पंच उपलब्ध करुन घेतले व सदर ठिकाणी माझी व दोन्ही पंचांची एकमेकांशी ओळख करून दिली. त्यानंतर पो.उप अधी. श्री. कुंभार यांचे सुचनेवरून दोन्ही पंचानी मला माझे नाव गाव विचारले असता, मी माझे नाव गाव त्यांना सांगितले. त्यानंतर पो.उप अधी. श्री. कुंभार यांचे सुचनेवरून दोन्ही पंचानी मला माझी तक्रार विचारली असता ती खालीलप्रमाणे असल्याचे सांगितले.

माझे चिंचोलीकाटी ग्रामपंचायत येथील गट नं. 141 या माझ्या मालकीच्या जागेवर घराचे बांधकाम सुरु असून, त्यासाठी पुनावाला होम फायन्सास, डफरीन चौक, सोलापूर येथे अंदाजे दोन महिन्यापूर्वी 8 लाख रु. होमलोन मिळण्यासाठी अर्ज सादर केला होता. सदर होमलोन मिळण्यासाठी मला चिंचोलीकाटी ग्रामपंचायत येथील ग्रामसेवक यांचे सही शिक्याचे गावठाण प्रमाणपत्र आवश्यक असल्याने, ते मिळण्यासाठी मी चिंचोलीकाटी ग्रामपंचायत येथील ग्रामसेवक श्री. वाघ यांचेकडे गेले 15 दिवसापासून पाठपुरावा करीत होतो. परंतू ग्रामसेवक श्री. वाघ यांनी सदर प्रमाणपत्र मिळण्यासाठी मी केलेला लेखी अर्ज न स्विकारता, वेळोवेळो "असे कोणतेही प्रमाणपत्र मी देत नाही, मी आता कामात आहे, मला आता वेळ नाही, परत या" असे सांगूण ते त्यांचे कायदेशीर काम करण्यास टाळाटाळ करीत होते. परंतू सदरचे प्रमाणपत्र मला माझे होमलोन प्रकरण मंजूर करण्यासाठी आवश्यक असल्याने, दि. 20/01/2024 रोजी ग्रामसेवक श्री. वाघ यांनी मला फोनवरुन सांगीतल्याप्रमाणे, मी सावळेश्वर टोलनाक्याचे अलीकडे पुण्याकडून सोलापूरकडे जाणा-या रोडवर असलेल्या चहा टपरीजवळ जावून त्यांना भेटलो असता, त्यांनी प्रथम माझ्याकडे गावठाण प्रमाणपत्र देण्यासाठी 20 हजार रुपयांची मागणी करुन नंतर तडजोडीअंती ग्रामसेवक श्री. वाघ यांनी माझ्याकडे 10 हजार रुपयाची मागणी केली. परंतू मला त्यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने मी सदरबाबत त्यांच्यावर योग्य ती कारवाई करावी अशी तक्रार सांगीतली व तशी सविस्तर तक्रार हस्तलिखित नोंदविली.

त्यानंतर पो.उप अधी. श्री. कुंभार यांनी मला सोलापूर-पुणे रोडवर असलेल्या निसर्ग हॉटेलसमोर थांबण्यास सांगीतले. त्याप्रमाणे मी तेथे जावून थांबलो असता, काहीवेळाने पो.उप अधी. श्री. कुंभार , पंच व सापळा पथक असे शासकीय गाडीतून आले. व पो.उप अधी. श्री. कुंभार यांनी ग्रामसेवक श्री. वाघ यांची समक्ष भेटून पडताळणी कारवाई करण्याचे ठरविले. त्याप्रमाणे पो.उप अधी. श्री. कुंभार यांनी त्यांच्याकडील व्हाईस रेकॉर्डर दाखवून, त्याची संपुर्ण माहिती मला तसेच दोन्ही पंचांना देवून त्या व्हाईस रेकॉर्डरमध्ये त्यांचेकडील नवीन मेमरीकार्ड टाकून, व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन ते माझ्या गळयात अडकवून मला तसेच पंच 01 यांना योग्य त्या सुचना देवुन, ग्रामसेवक वाघ यांचेशी मोबाईलव्दारे झालेल्या बोलण्याप्रमाणे पडताळणी करण्याचे अनुषंगाने माझ्याकडील मो. सायकलवरुन पुणे-सोलापूर रोडवर असणा-या जे.के. ढाबाच्या समोर विरुध्दबाजूस पुण्याकडे जाणा-या रोडवर याठिकाणी पाठवले. सदर ठिकाणी ग्रामसेवक श्री. वाघ व अजून एक अनोळखी इसम हे एका मो.सायकलवरुन मी थांबलेल्या ठिकाणी आले. व मला अजून पुढे येण्यास सांगीतले. त्याप्रमाणे मी व पंच असे त्यांचे पाठोपाठ जावून सावळेश्वर

टोलनाक्याच्या जवळील इंडीयन ऑईल पेट्रोलपंपाजवळ रोडवर थांबलो, तेथे माझी ग्रामसेवक श्री. वाघ यांचेशी भेट झाली. व आमच्यामध्ये कामाची चर्चा झाली. त्यावेळी त्याचे सोबत असलेला मो.सायकल चालविणा-या अनोळखी इसमाने हाताचा इशारा करुन, "तुमच ठरल का नाही साहेबाच तूमच" असे म्हणाले. त्यावर मी नाही ठरलं असे म्हणालो, त्यानंतर श्री. वाघ यांनी मला ग्रामपंचायतीचा कंत्राटी शिपाई पाटोळे यास भेटा व त्याला सांगतो असे सांगीतले, व ते दोघे त्यांचे मो.सायकलवरुन निघून गेले. त्यानंतर मी, पंच 01 यांच्यासह पोउपअधी कुंभार व सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी आलो. व त्यांनी मला व पंच 01 यांना हकीकत विचारुन तसेच व्हॉईस रेकॉर्डरमध्ये झालेले रेकॉर्डींग ऐकुण खात्री केली.

सदर पडताळणी कारवाई दरम्यान ग्रामसेवक श्री. वाघ यांनी शिपाई परशुराम पाटोळे यांना भेटण्यास सांगीतल्यामुळे त्याचेवर पडताळणी कारवाई करण्याचे अनुषंगाने पो.उप अधि. श्री. कुंभार यांनी मला तसेच पंच 01 यांना योग्य त्या सुचना देवुन, त्यांच्याकडील व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन तो माझ्या गळ्यात अडकवून शिपाई पाटोळे यास भेटण्यासाठी शिपाई पाटोळे यांनी सांगीतल्याप्रमाणे चिंचोलीकाटी येथे त्याचे राहते घरी पाठवले. त्यावेळी तेथे माझी शिपाई पाटोळे याची भेट झाली, त्यावेळी शिपाई पाटोळे यानी त्यांचे मोबाईलवरुन ग्रामसेवक यांना फोन लावून, मी आल्याचे सांगीतले. व त्या दोघांचे मोबाईलवरील बोलणे झाल्यानंतर ग्रामसेदक श्री. वाघ यांनी सदर प्रमाणपत्र देण्यासाठी 7000 रु. मागितले असल्याचे शिपाई पाटोळे यांनी मला पंचसमक्ष सांगीतले. त्यावेळी मी त्याला मला प्रमाणपत्र ज्यावेळी मिळेत त्याच वेळी मी पैसे देतो असे सांगीतले असता, शिपाई पाटोळे यांनी पुन्हा श्री. वाघ यांना फोन करुन मला सोमवारी सकाळी येण्यास सांगीतले. त्यानंतर मी, पंच 01 असे सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी आलो. तेथे पोउपअधि कुंभार यांनी मला व पंच 01 यांना हकीकत विचारुन तसेच व्हॉईस रेकॉर्डमध्ये झालेले रेकॉर्डींग ऐकुण खात्री केली.

आज दि. 22/01/2024 रोजी मी सांगतल्याप्रमाणे पो.उप अधि.श्री. कुंभार , सापळा पथक व पंच असे सोलापूर विदयापीठचे जवळ, पुणे-सोलापूर हायवेवर येवून थांबले होते. त्यावेळी मी त्यांना सकाळी शिपाई पाटोळे याचा फोन आला असल्याचे व त्यांनी मला एकटयालाच गावातील धर्मराज मंदीराजवळ बोलावले असल्याचे व तेथून ग्रामसेवक श्री. वाघ यांना भेटण्यासाठी जाईचे असल्याचे सांगीतले. त्याप्रमाणे पोउपअधि कुंभार यांनी ग्रामसेवक श्री. वाघ व शिपाई श्री. पाटोळे यांचेवर सापळा कारवाई करण्याचे ठरवीले. त्याप्रमाणे मी सापळा कारवाईसाठी लागणारे 7,000 /- रु. हजर केले. त्यावर पोउपअधि कुंभार यांनी नोटांना अँथ्रासिन पावडर लावून, सापळा पूर्व कारवाई पूर्ण केली. सदर लाच रक्कम माझ्या पॅन्टच्या उजव्या खिशामध्ये ठेवली. त्यानंतर मला, दोन्ही पंचांना व सापळा पथकातील अंमलदार यांना त्यांच्या कामाच्या अनुषंगाने पोउपअधि कुंभार यांनी योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर त्यांनी श्री. वाघ व श्री. पाटोळे यांच्यावर सापळा कारवाई करण्याकरीता व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन, तो माझ्या गळयात अडकावून मला व पंच क्र. 01 यांना माझ्या दुचाकी वरुन सदर ठिकाणी पाठविले. व आमचे पाठोपाठ पोउपअधि कुंभार, पंच क्र. 02 व सापळा पथक असे आले. सदर ठिकाणी गेल्यानंतर श्री. पाटोळे यांनी इशा-याने पंच क्र. 01 यास गाडीवरुन उतरण्यास सांगून, तो माझ्या गाडीवर पाठीमागे बसला, व मला मो.सायकल सावळेश्वर टोलनाक्याकडे घेण्यास सांगीतले. त्याप्रमाणे पंच 01 यांनी सापळा पथकाकडे जावून सदर बाबत माहिती देवून, सापळा पथक व पंच क्र. 01 व 02 असे शासकीय वाहनाने आमच्या पाठोपाठ आले.

शिपाई श्री. पाटोळे यांनी सांगीतल्याप्रमाणे मी मो.सायकल पुणे-सोलापूर रोडवर असलेल्या संदीपान गायकवाड मॅरेज हॉलचे समोर रोडवर थांबवली. काहीवेळाने आम्ही थांबलेल्या रोडचेच समोर विरुध्द बाजूस पुण्याकडून सोलापूरकडे जाणा-या रोडवर ग्रामसेवक श्री. वाघ व पडताळणी कारवाईवेळी असलेला अनोळखी इसम मो.सायकलवरुन आले. व श्री. वाघ यांनी मला व श्री. पाटोळे यांना त्यांचेकडे बोलावले. त्याप्रमाणे आम्ही त्यांचेकडे गेलो असता, श्री. वाघ यांनी मला माझे गावठाण प्रमाणपत्र दिले. व हाताच्या इशारा करुन माझ्याकडे पैशाची मागणी केली. त्याप्रमाणे मी माझ्या पॅण्टच्या उजव्या खिशात ठेवलेली लाच रक्कम उजव्या हाताने काढून ग्रामसेवक श्री. वाघ यांचे समोर धरली, त्यांनी सदरची रक्कम मो.सायकल चालवणा-या अनोळखी इसमाकडे देण्यास सांगीतली. त्यावेळी अनोळखी इसमाने सदर लाच रक्कम उजव्या हाताने स्वीकारुन, मोजून शिपाई श्री. पाटोळे यांचेकडे दिली. श्री. पाटोळे यांनी सदर रक्कम डाव्या हाताने स्विकारुन, त्याचे पॅण्टचे डाव्या खिशात ठेवली. व अनोळखी इसम पुढे, श्री. पाटोळे मधे व मागे श्री. वाघ असे मो.सायकलवरुन बसून सोलापूरचे दिशेने निघून गेले. त्यानंतर ठरल्याप्रमाणे मी पोउपअधि कुंभार यांना फोन करुन लाच स्वीकारल्याचा इशारा केला. त्याप्रमाणे पोउपअधि कुंभार व सापळा पथक यांनी मला माझ्या मो.सायकलवरुन मागे येण्यास सांगून, त्यांचे शासकीय गाडीने त्यांचा पाठलाग करु लागले. त्यांना सापळा पथकाचा संशय आल्याने, व पोउपअधी श्री. कुंभार यांनी त्यांना थांबण्याचा इशारा केला तरी मो.सायकल चालक अनोळखी इसम याने वडवळ फाटयाजवळ मो.सायकल हायवे वरुन बाजूला आड रस्त्यावर घेतली. व ते सर्व मो.सायकल सोडून बाजूच्या शेतात पळून जावू लागले. तसे पोउपअधी श्री. कुंभार व सापळा पथकामधील अंमलदार यांनी

पाठलाग करुन ग्रामसेवक श्री. वाघ व शिपाई श्री. पाटोळे यांना पकडले. परंतू अनोळखी इसम सदर ठिकाणावरुन पळून जाण्यास यशस्वी झाला, त्याचा शोध घेतला परंतू तो मिळून आला नाही. त्यानंतर पोउपअधि. श्री. कुंभार यांनी ग्रामसेवक श्री. वाघ व शिपाई श्री. पाटोळे यांना शासकीय वाहनामध्ये बसवून त्यांचेवर सदर ठिकाणी लाचेच्या सापळ्यातील प्राथमिक तपासणी केली. व त्यांना त्यांचे नाव व पत्ता विचारले असता, 1. श्री. संतोषकुमार नागनाथ वाघ, वय 37 वर्षे, ग्रामसेवक, चिंचोलीकोटी ग्रामपंचायत, रा. गवत्या मारुती चौक, मोहोळ, ता. मोहोळ व 2. श्री. परशुराम रविंद्र पाटोळे, वय 35 वर्षे, कंत्राटी शिपाई, चिंचोलीकाटी ग्रामपंचायल, रा. चिंचोलीकाटी, ता. मोहोळ असे असल्याचे व पळून गेलेल्या अनोळखी इसमाचे नाव 3. श्री. सुधीर लांडगे, वय 48 वर्षे, धंदा ठेकेदार, रा. सावळेश्वर, मोहोळ असे असल्याचे सांगीतले. पुढील सर्व सविस्तर पंचनामा तसेच इतर कारवाई ही अँन्टी करप्शन ब्युरो, सोलापूर येथे येवून पूर्ण करण्यात आली.

तरी दि. 20/01/2024 रोजीचे 17.46 वा. पासून ते 19.45 वा. पावेतो व आज दि. 22/01/2024 रोजीचे 12.12 वा. पासून ते 13.05 वा. पावेतो माझ्या होमलोनसाठी आवश्यक असलेले गावठाण प्रमाणपत्र देण्यासाठी चिंचोलीकाटीचे ग्रामसेवक 1. श्री. संतोषकुमार वाघ यांनी माझ्याकडे कंत्राटी शिपाई 2. श्री. परशुराम पाटोळे यांचे करवी त्यांनी त्यांचे लोकसेवक पदाचा दुरुपयोग करुन, त्यांना कायदयाने मिळावयाचे त्या खेरीज लाच म्हणून माझेकडे 10,000/-रु लाचेची मागणी करुन, तडजोडी अंती 7,000/- रु. लाच रक्कम खाजगी इसम 3. श्री. सुधीर लांडगे यांचे मार्फतीने स्वत:करीता स्विकारुन त्यांनी सांपत्तीक फायदा मिळवून गुन्हेगारी स्वरुपाचे वर्तन केले आहे. म्हणून माझे त्यांचे विरोधात भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम अन्वये फिर्याद आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

ASHOK GULAB SAYKAR(I (Inspector)) / PBMH73720 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

15. **Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

पोलीस ठाणे अंमलदार
मोहोळ, पोलीस स्टेशन

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** ASHOK GULAB SAYK
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** PBMH73720